# अनामप्रेम स्नेहवार्ता





## अनामप्रेम मासिक वृत्तपत्रिका
## जुलै - 2026

**अनामप्रेम हेल्पलाईन क्रमांक - 9011946868**

# स्मार्ट व्हिजन ग्लासेस प्रशिक्षण




कम्युनिटी आय केअर फाउंडेशन (गोगटेज आय क्लिनिक, पुणे) यांच्या सहकार्याने अनामप्रेम संस्थेतील अंध विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या स्मार्ट व्हिजन ग्लासेसचा प्रभावी वापर करता यावा यासाठी ऑनलाइन प्रशिक्षण आयोजित करण्यात आले.

श्री. राम सिंग यांनी विद्यार्थ्यांना कागदपत्रे वाचणे, नोटा-नाणी ओळखणे, परिसराची माहिती जाणून घेणे आणि दैनंदिन जीवनात या उपकरणाचा प्रभावी वापर करण्याबाबत मार्गदर्शन केले.




या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास आणि स्वावलंबन वाढण्यास मोठी मदत होणार असून, आधुनिक तंत्रज्ञान त्यांच्या सक्षम भविष्यासाठी महत्त्वाचे पाऊल ठरत आहे.

**नवा मराठा**

epaper.enavamaratha.com
09 Jul 2026 - Page 5

## ‘अनामप्रेमच्या’ विद्यार्थ्यांनी लुटला ‘देऊळ बंद २’ चित्रपटाचा आनंद

**रोटरी क्लब मिडटाउनचा सामाजिक उपक्रम**

नगर – चित्रपटगृहात जाऊन चित्रपट पाहण्याचा अनुभव दुर्लभ असलेल्या अनामप्रेम संस्थेतील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी नगरच्या रोटरी क्लब मिडटाउनच्या वतीने सध्या गाजत असलेल्या ‘देऊळ बंद २’ या मराठी चित्रपटाचा विशेष शो आयोजित करण्यात आला. या अनोख्या उपक्रमामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर अविस्मरणीय आनंद फुलला. यानिमित्ताने शहरातील माय सिनेमामध्ये सकाळीच अनामप्रेम संस्थेतील विद्यार्थ्यांच्या उत्साहाने परिसर गजबजून गेला. या विद्यार्थ्यांमध्ये अंध आणि मूकबधिर विद्यार्थ्यांची संख्या मोठी होती. तरीही चित्रपटगृहात प्रवेश करताना त्यांच्या चेहऱ्यावरील कुतूहल, उत्सुकता आणि आनंद ओसंडून वाहत होता. एकमेकांचा हात धरत, सहकाऱ्यांच्या मदतीने सर्वांनी चित्रपटगृहात प्रवेश केला आणि या आगळ्यावेगळ्या अनुभवाचा मनमुराद आनंद लुटला.

रोटरी क्लब मिडटाउनच्या ज्येष्ठ सदस्या सुजाता वाबळे यांच्या पुढाकारातून हा सामाजिक उपक्रम साकार झाला.

क्लबचे अध्यक्ष ॲड. हेमंत कराळे आणि सचिव मधुर बागायत यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

या उपक्रमाबद्दल अनामप्रेम संस्थेचे अध्यक्ष अजित माने व संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी तसेच विद्यार्थ्यांनी रोटरी क्लब ऑफ अहमदनगर मिडटाऊनचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

सुजाता वाबळे म्हणाल्या, या विद्यार्थ्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहातील सांस्कृतिक अनुभवांचा आनंद मिळावा व त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. त्यांच्या आनंदातच आमचाही आनंद आहे.

प्रास्ताविकात ॲड. हेमंत कराळे म्हणाले, रोटरी मिडटाउन क्लब कायम वंचितांसाठी योगदान देत त्यांच्या जीवनात आनंद आणण्याचा प्रयत्न करत आहे. त्यांच्या गरजाही पूर्ण करण्यास रोटरी कायम पुढे आहे.

यावेळी क्लबच्या सदस्या मार्टिन एलिसा, महेश गोपालकृष्णन, नाना वाबळे, वैशाली कराळे, टीना इंगळे, अनुजा जाधव, डॉ. प्रसाद उबाळे, प्रियंका पिसुटे, डॉ.सोनल बोरुडे, डॉ. सारिका मोरे, अभिजीत जाधव, अनुजा जाधव, सुजाता उबाळे, उमंग नंदा, डॉ. प्रियंका पाटील, अनुराधा आरसुळे उपस्थित होते. मधुर बागायत यांनी आभार मानले.



अनामप्रेम संस्थेतील विद्यार्थ्यांसाठी नगरच्या रोटरी क्लब मिडटाउनच्या वतीने सध्या गाजत असलेल्या ‘देऊळ बंद २’ या मराठी चित्रपटाचा विशेष शो आयोजित करण्यात आले होते.

## अनामप्रेमच्या दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी 'देऊळ बंद २' चित्रपटाचा विशेष शो

रोटरी क्लब मिडटाऊन, अहिल्यानगर यांच्या पुढाकारातून अनामप्रेम संस्थेतील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी 'देऊळ बंद २' या मराठी चित्रपटाचा विशेष शो आयोजित करण्यात आला. चित्रपटाचा आनंद घेत विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर समाधान आणि उत्साह झळकला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना मनोरंजनासोबतच समाजाशी जोडले जाण्याचा सुंदर अनुभव मिळाला.

# अनामप्रेम संस्थेच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पास जिल्हा परिषद अधिकाऱ्यांची सदिच्छा भेट; 'नमो दिव्यांग योजना' प्रभावीपणे राबविण्यासाठी मार्गदर्शन

अनामप्रेम संस्था संचलित सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प, निंबळक येथे जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. विजय मुळीक व जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी मा. श्री. देविदास कोकाटे यांच्यासह मान्यवरांनी सदिच्छा भेट देऊन संस्थेच्या विविध प्रकल्पांची पाहणी केली.

यावेळी कौशल्य विकास केंद्र, गौरंग अभिनव शाळा, गोशाळा तसेच स्पाइनल कॉर्ड इंज्युरी सेंटरची माहिती घेण्यात आली. शासनाच्या 'नमो दिव्यांग योजना' प्रभावीपणे राबविण्यासाठी अधिकाऱ्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. संस्थेचे कार्य पाहून मान्यवरांनी समाधान व्यक्त करत संस्थेच्या समाजाभिमुख उपक्रमांचे कौतुक केले व भविष्यातही सहकार्याची ग्वाही दिली.



बातम्यांचा राजा
जनप्रवास

**अनामप्रेम संस्थेच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पास जिल्हा परिषद अधिकाऱ्यांची सदिच्छा भेट; ' नमो दिव्यांग योजना' राबविण्यासाठी मोलाचे मार्गदर्शन**

■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : अनामप्रेम संस्था संचलित सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प, निंबळक येथील जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्रास जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. विजय मुळीक साहेब, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी मा. श्री. देविदास कोकाटे साहेब, मा. श्री. जाधव साहेब तसेच गटशिक्षणाधिकारी मा. सौ. तृप्ती कोलते यांनी सदिच्छा भेट देऊन संस्थेच्या विविध उपक्रमांची पाहणी केली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष इंजि. अजित माने, संचालक श्री. अभय रायकवाड, प्रकल्प व्यवस्थापक श्री. रामदास काकडे, श्री. विष्णू वारकरी तसेच संस्थेच्या कर्मचारीवृंदाने उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. स्वागतानंतर मान्यवरांच्या हस्ते संस्थेच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.







# अनामप्रेम संस्थेत राष्ट्रीय डॉक्टर्स डे उत्साहात; विद्यार्थ्यांचा गौरव व शैक्षणिक साहित्य वाटप











राष्ट्रीय डॉक्टर्स डे निमित्त अनामप्रेम संस्थेत विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. जी. पी. असोसिएशन, अहिल्यानगरच्या डॉक्टरांनी दिव्यांग विद्यार्थ्यांची भेट घेऊन त्यांना शुभेच्छा व मार्गदर्शन केले. यावेळी दहावी-बारावीतील गुणवंत दिव्यांग विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला तसेच 'चैतन्य फाउंडेशन'च्या माध्यमातून शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. उपस्थित डॉक्टरांनी अन्नदान करून सामाजिक बांधिलकी जपली. या कार्यक्रमास जी. पी. असोसिएशनचे डॉ अभिजीत बोरुडे, डॉ गणेश गावडे, डॉ दीपक कारखिले, डॉ किरण कर्डिले, डॉ मनीषा थवानी, डॉ निशांत गरुड, डॉ प्रशांत सुरकुटला, डॉ सचिन साळवे, डॉ शरद मुळे, डॉ संतोष गुगळे, डॉ विकी गांधी, डॉ सुरेंद्र खोपे यांच्यासह संस्थेचे कार्यकर्ते व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्व. उज्वला आव्हाड यांच्या पुण्यस्मरणानिमित्त बँक ऑफ इंडियाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांची अनामप्रेम संस्थेला सदिच्छा भेट

स्व. उज्वला आव्हाड यांच्या द्वितीय पुण्यस्मरणानिमित्त बँक ऑफ इंडियाचे अधिकारी श्री. रवींद्र आंधळे व कर्मचारीवृंदांनी अनामप्रेम संस्थेला भेट दिली. यावेळी संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी बँकिंग सेवा, किमान शिल्लक (Minimum Balance) आणि दृष्टिहीन व्यक्तींना एटीएम कार्ड मिळण्याबाबत प्रश्न विचारले. बँक अधिकाऱ्यांनी सर्व शंकांचे सोप्या भाषेत समाधान केले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यात आला आणि उपस्थितांचे आभार मानण्यात आले.




## इन्फॉसिस फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांची अनामप्रेम संस्थेला सदिच्छा भेट. दिव्यांग सेवाकार्याचे कौतुक.

इन्फॉसिस फाउंडेशनचे पदाधिकारी श्री. तेवा कन्नन व श्रीमती स्नेहा विजयन यांनी अनामप्रेम संस्थेच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पाला भेट देऊन विविध उपक्रमांची पाहणी केली. फाउंडेशनच्या सहकार्याने उभारण्यात आलेल्या २० किलोवॅट सोलर प्रकल्पाची पाहणी करत त्यांनी कौशल्य विकास केंद्र आणि स्पायनल कॉर्ड इंज्युरी सेंटरलाही भेट दिली. संस्थेचे सामाजिक कार्य, दिव्यांग पुनर्वसन आणि स्वावलंबनासाठी सुरू असलेल्या उपक्रमांचे त्यांनी कौतुक केले तसेच भविष्यातही सहकार्याची भावना व्यक्त केली.









www.anamprem.org

# सेवेच्या प्रवासाला सदिच्छा भेटीतून नवी ऊर्जा





















**ॲड. कु. पूजा चिटमिल मॅडम व स्नेहालय - अनामप्रेम चे हितचिंतक श्री. रोहित परदेशी यांनी अनामप्रेमच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प, निंबळक येथे सदिच्छा भेट**

# दिव्यांग युवकांच्या नेतृत्वाला नवी दिशा – 'Anamprem Rotaract Club, Ahilyanagar' ची स्थापना




दिव्यांग युवकांमध्ये नेतृत्वगुण, व्यक्तिमत्त्व विकास, सामाजिक बांधिलकी आणि सेवाभाव वाढविण्याच्या उद्देशाने 'Anamprem Rotaract Club, Ahilyanagar' ची अधिकृत स्थापना करण्यात आली. रोटरी क्लब ऑफ अहमदनगर मिडटाऊन प्रायोजित या क्लबच्या अध्यक्षपदी आनंद माळवे तर सचिवपदी सुरेखा राठोड यांची निवड करण्यात आली. दिव्यांग युवकांना समाजाशी अधिक सक्षमपणे जोडणारे हे व्यासपीठ सेवा, मैत्री आणि नेतृत्वाची नवी प्रेरणा देणारे ठरणार आहे.




**चैतन्य फाउंडेशनच्या वतीने दिव्यांग मुलांना शैक्षणिक किटचे वाटप करण्यात आले. या मदतीमुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध झाले असून, त्यांच्या शिक्षणाच्या प्रवासाला नवी प्रेरणा आणि बळ मिळाले.**

**कै. मनीष कुलकर्णी स्मृती राज्यस्तरीय सुगम संगीत स्पर्धेत अनामप्रेमची चमक!**

**अहमदनगर बॅकस्टेज आर्टिस्ट्स असोसिएशन आयोजित राज्यस्तरीय सुगम संगीत स्पर्धेत अनामप्रेमच्या हिंमतभवन वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली.**



# शास्त्रीय गायन स्पर्धेमध्ये सुयश मिळविलेल्या अनामप्रेम मधील विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ संपन्न.

**समाचार**

## शास्त्रीय गायन परीक्षेत शिवरंजन संगीतालयाचे यश

**समाचार/नगर-दि.१३**

एप्रिल २०२६ च्या गांधर्व निकेतनने घेतलेल्या परिक्षेत शिवरंजन संगितालयाच्या शास्त्रीय गायन परिक्षेत विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले.

प्रारंभिक परिक्षेत सुप्रिया शेंडगे, आरवी जगताप, द्वारका जोरवर यांनी प्रथम श्रेणित तर सुखदा गायकवाड, सई गणेश रडे, ओमांश बोली यांनी विशेष योग्यतेसह उत्तीर्ण झाले आहेत.

तर प्रवेशिका प्रथम मध्ये राधा यादव, काजल आसावणे, बलराम यादव, केवल्य कुलकर्णी, सर्वज्ञ शेंडगे यांनी प्रथम श्रेणीत तर श्रध्दा काळे, स्वरांगी जायगुडे, स्वरा मोरे यांनी विशेष योग्यतेसह उत्तीर्ण झाले आहेत.

मध्यमा प्रथम परिक्षेत गौरी इंगळे, मध्यमा पुर्ण परिक्षेमध्ये पुनम इंगळे व विशारद प्रथममध्ये सौदागर लोंडे यांनी अनुक्रमे द्वितीय व प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले आहेत.

सर्व विद्यार्थ्यांना शिवरंजन संगितालयाचे संचालक प्रकाश शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.









## अनामप्रेमच्या दिव्यांग विद्यार्थ्यांची शिर्डी–नेवासा आध्यात्मिक सहल उत्साहात संपन्न

अनामप्रेम संस्थेच्या अंध व अस्थिव्यंग विद्यार्थ्यांनी शिर्डी येथे श्री साईबाबांचे दर्शन घेतले तसेच द्वारकामाई, चावडी आणि नेवासा येथील पवित्र पैस खांबाला भेट देऊन आध्यात्मिक अनुभव घेतला. अनेक विद्यार्थ्यांसाठी हे पहिलेच साईदर्शन असल्याने त्यांच्या आनंदाला पारावार उरला नाही.

ही सहल यशस्वी करण्यासाठी मनोमय हीलिंग हार्ट फाउंडेशन, राहाता आणि त्यांच्या टीमने व्हीआयपी दर्शन, महाप्रसाद व भोजनाची उत्कृष्ट व्यवस्था केली. संस्थेचे अध्यक्ष श्री. अजित माने, सौ. अनिता माने, संचालक श्री. अभय रायकवाड, डॉ. मेघना मराठे तसेच कार्यकर्त्यांच्या सहकार्यामुळे सहल सुरळीत पार पडली.

या सहलीमुळे दिव्यांग विद्यार्थ्यांना आध्यात्मिक आनंद, आत्मविश्वास आणि नव्या सकारात्मक ऊर्जेची प्रेरणा मिळाली.

# आषाढी एकादशी भक्तिमय उत्सव






आषाढी एकादशीच्या पावन दिनानिमित्त अनामप्रेमच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पात सकाळी हरिनामाच्या गजरात, टाळ-मृदुंगाच्या निनादात आणि विठ्ठलभक्तीच्या वातावरणात दिंडी सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. दिव्यांग लाभार्थी, विद्यार्थी आणि वारकऱ्यांच्या सहभागामुळे संपूर्ण परिसर विठ्ठलमय झाला.

सायंकाळी हिंमत भवन निवासी वस्तीगृहात प्रकाशगान संगीत मंच यांच्या सुरेल भजन संध्या कार्यक्रमाने भक्तिमय वातावरणाची निर्मिती केली. अभंग, भजन आणि "जय जय राम कृष्ण हरी" च्या अखंड गजराने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले.






## दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी 'LetSee' ॲप प्रशिक्षण व विकासाबाबत चर्चा संपन्न

अनामप्रेम, पुणे येथे दृष्टिहीन विद्यार्थ्यांसाठी विकसित करण्यात आलेल्या 'LetSee' ॲपच्या वापराचे प्रात्यक्षिक व प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. श्री. शौनक सावरगावकर यांनी विकसित केलेले हे ॲप पुस्तके वाचणे, कपड्यांचे रंग व डाग ओळखणे, समोरील व्यक्तीची माहिती मिळवणे अशा दैनंदिन कामांमध्ये दृष्टिहीनांना मोठी मदत करते.

यावेळी दिव्यांग विद्यार्थ्यांच्या गरजांनुसार ॲपमध्ये भविष्यात करता येणाऱ्या नवीन सुविधा व सुधारणा यावरही सकारात्मक आणि फलदायी चर्चा करण्यात आली.

# अनामप्रेम मराठवाडा वसतीगृहातील अपडेट.



वाढदिवसानिमित्त अनामप्रेम संस्थेला सदिच्छा भेट

सौ. अनुप्रिया अनिल दलाल व प्रा. अनिल का. दलाल तसेच सौ. सायली (आराध्या) यांनी सौ. अनुप्रिया यांच्या वाढदिवसानिमित्त अनामप्रेम संस्थेला सदिच्छा भेट



मा. संजयजी मंत्री यांच्या अनामप्रेम भेटीत संस्थेच्या आगामी उपक्रमांबाबत सकारात्मक चर्चा झाली. त्यांच्या सहकार्याच्या आश्वासनाने भविष्यातील वाटचालीला नवी ऊर्जा मिळाली.



दिव्यांग बांधवांसाठी सातत्याने कार्यरत असलेले सोन्गेश सर यांची अनामप्रेमला भेट



सौ. संध्या आर. के. व श्रीयुत रवी आर. के. यांनी आपल्या दिवंगत सुपुत्राच्या स्मृतिप्रीत्यर्थ अनामप्रेममध्ये अन्नदान



अन्नदान... सेवेतून वाढदिवसाचा आनंद!
सौ. अनुप्रिया व प्रा. अनिल दलाल तसेच सौ. सायली (आराध्या) यांनी वाढदिवसानिमित्त अनामप्रेमच्या विद्यार्थ्यांसाठी किराणा मालाची मदत.

# दृष्टी नव्हती... पण ध्येय होतं!



## प्रल्हाद पांडव -
## अंधाराला हरवून प्रकाशाचा दीप बनलेला प्रेरणाप्रवास

"आकाशाला गवसणी घालणारी स्वप्नं तीच असतात, जी झोपेत नव्हे, तर उघड्या डोळ्यांनी—आणि कधी कधी डोळे नसतानाही—मनाने पाहिली जातात!"

काही व्यक्ती स्वतःचे आयुष्य घडवतात; तर काही व्यक्ती स्वतः घडताना इतरांसाठी प्रेरणेचा दीपस्तंभ बनतात. अशाच प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वाचं नाव म्हणजे प्रल्हाद साळूबा पांडव.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड तालुक्यातील भराडी या छोट्याशा गावात २७ मार्च २००१ रोजी जन्मलेला हा मुलगा जन्मतःच अंधत्वाचं आव्हान घेऊन या जगात आला. पण त्याने अंधत्वाला आपलं भविष्य ठरू दिलं नाही. उलट, "दृष्टी नसली तरी दृष्टिकोन असला की अशक्यही शक्य होतं," हे आपल्या जीवनातून सिद्ध करून दाखवलं.

संघर्षाच्या मातीत रुजलेलं स्वप्न...

प्रल्हाद यांचे वडील साळूबा शंकर पांडव आणि आई तुळसाबाई साळूबा पांडव हे रोजंदारी मजुरी करून संसाराचा गाडा ओढणारे कष्टकरी. आईदेखील जन्मतः दृष्टिहीन. घरात तीन भावंडे, गरिबीचं सावट आणि अनुवंशिक अंधत्वाचं संकट—परिस्थिती अत्यंत कठीण होती.

"अडचणी माणसाला थांबवत नाहीत; त्या त्याच्या सामर्थ्याची ओळख करून देतात."

त्या काळी अंध विद्यार्थ्यांसाठी शाळांची संख्या अत्यल्प होती. त्यामुळे प्रल्हाद आणि त्यांचे भाऊ काकासाहेब यांचे शिक्षणही उशिरा सुरू झाले. तारामती बाफना अंध विद्यालय, संभाजीनगर येथील शिक्षक गावात सर्वेक्षणासाठी आले आणि त्यांना या दोन्ही भावांची माहिती मिळाली. तेथून त्यांच्या शिक्षणाच्या प्रवासाला पहिलं पाऊल मिळालं.

अनामप्रेम – आयुष्याला दिशा देणारा टर्निंग पॉइंट

सन २०१२ मध्ये प्रल्हाद यांनी अनामप्रेम संस्थेत प्रवेश घेतला आणि त्यांच्या आयुष्याला अक्षरशः नवं वळण मिळालं.

सहावी ते दहावीपर्यंतचं शिक्षण विनायक पाऊलबुद्धे विद्यालय, अहिल्यानगर येथे पूर्ण केल्यानंतर त्यांनी न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर येथून पदवी तसेच एम.एस्सी. (समाजशास्त्र) पदवी संपादन केली.

पण हा प्रवास इतका सोपा नव्हता.
शाळेत उशिरा प्रवेश, परीक्षांसाठी योग्य लेखनिक मिळेल की नाही याची चिंता, घरची अत्यंत हलाखीची परिस्थिती, पुढील शिक्षणाचं अनिश्चित भविष्य—या असंख्य प्रश्नांनी त्यांचं मन व्यापलेलं होतं.

अनामप्रेम संस्थेने मात्र या प्रत्येक प्रश्नाचं उत्तर दिलं.
संस्थेने त्यांना केवळ निवास, अन्न आणि शिक्षण दिलं नाही, तर आत्मविश्वास, स्वाभिमान आणि आयुष्याकडे पाहण्याची नवी दृष्टी दिली.

डोळ्यांतच नव्हे... जगण्यातही उजेड
अनामप्रेम संस्थेच्या माध्यमातून प्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ. प्रकाश कांकरिया यांच्या शस्त्रक्रियेमुळे प्रल्हाद यांना अल्पदृष्टी प्राप्त झाली.

हा केवळ डोळ्यांचा प्रकाश नव्हता; हा त्यांच्या संपूर्ण आयुष्याला उजाळा देणारा क्षण होता.

"कधी कधी एका किरणाने संपूर्ण आयुष्य उजळून निघतं."

शिक्षणासोबत घडलेलं व्यक्तिमत्त्व
अनामप्रेम संस्थेत प्रल्हाद यांनी केवळ पुस्तकी शिक्षण घेतलं नाही; तर जीवन जगण्याची कला शिकली.

संस्थेच्या एमएस-सीआयटी (MS-CIT) प्रशिक्षणाचा ते पहिला विद्यार्थी ठरले. संगणकाचं ज्ञान, मोबाईल आणि सोशल मीडियाचा वापर, डिजिटल साक्षरता—या सर्व गोष्टी त्यांनी आत्मसात केल्या.

संस्थेने उपलब्ध करून दिलेलं अभ्यासासाठीचं पोषक वातावरण, कार्यकर्त्यांचं सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि कौटुंबिक आपुलकी यामुळे त्यांचा आत्मविश्वास दिवसेंदिवस वाढत गेला.
यानंतर त्यांनी अनामप्रेम संस्थेच्या शारदा वसतिगृह, पुणे येथे तब्बल तीन वर्षे सेवा कार्यकर्ता म्हणून काम केलं. या सेवाकाळात त्यांच्यात नेतृत्वगुण, सामाजिक बांधिलकी आणि जबाबदारीची जाणीव अधिक दृढ झाली.

स्वप्न सरकारी नोकरीचं... आणि जिद्दही तितकीच मोठी

"कष्टाला पर्याय नसतो, आणि प्रामाणिक कष्टांना अपयशाची भीती नसते."

सरकारी नोकरीचं स्वप्न उराशी बाळगून प्रल्हाद यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू ठेवली. संघर्ष सुरू असतानाच त्यांनी स्वामी विवेकानंद महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे जवळपास अडीच वर्ष संगणक प्रशिक्षक म्हणून कार्य केलं.

मात्र त्यांची धडपड तिथेच थांबली नाही.

अखंड परिश्रम, चिकाटी आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर त्यांनी स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण केली आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड येथे शासकीय सेवेत रुजू होऊन आपल्या स्वप्नाला वास्तवात उतरवलं.

स्वतः उभे राहिले... आणि इतरांसाठी वाटाडे बनले

आज प्रल्हाद पांडव यांचा जीवनप्रवास हजारो दिव्यांग युवक-युवतींसाठी आशेचा किरण आहे.

त्यांनी सिद्ध करून दाखवलं—

"दिव्यांगत्व ही कमजोरी नसते; योग्य संधी, योग्य मार्गदर्शन आणि अढळ जिद्द मिळाली तर तीच व्यक्ती समाजासाठी प्रेरणास्तंभ ठरते."

त्यांचा प्रवास आपल्याला शिकवतो की अंधार हा शेवट नसतो; तो नव्या प्रकाशाची सुरुवात असते.

प्रेरणेचा संदेश

"ज्याच्या नशिबात अंधार लिहिला होता, त्यानेच इतरांच्या आयुष्यात प्रकाश पेरला... यापेक्षा मोठं यश कोणतं?"

प्रल्हाद पांडव यांची यशोगाथा ही केवळ एका दृष्टिहीन युवकाची कथा नाही; ती जिद्दीची, शिक्षणाची, आत्मविश्वासाची आणि संधी मिळाल्यास प्रत्येक दिव्यांग व्यक्ती समाजात सर्वोच्च स्थान मिळवू शकते, याची जिवंत साक्ष आहे.

दृष्टी नसली तरी दृष्टिकोन असला, जिद्द असली आणि योग्य हात साथ देणारे असले तर कोणताही अंधार कायमचा राहत नाही.

प्रल्हाद पांडव यांचा प्रेरणादायी जीवनप्रवास प्रत्येकाला एकच संदेश देतो—

"स्वप्न पाहण्यासाठी डोळ्यांची गरज नसते; गरज असते ती ध्येयावर विश्वास ठेवणाऱ्या मनाची."


## संस्थेतील दिव्यांग बांधवांच्या कौशल्यातून बनवण्यात आलेल्या दर्जेदार वस्तू

# अनामप्रेम कौशल्य विकासालय अंतर्गत कौशल्य निर्मिती



हवाई चप्पल, क्रॉक्स

दिव्यांग निर्मित उत्पादने खरेदी करून त्यांना रोजगारक्षम बनवा.



नॅपकिन बुके, सॅनिटरी पॅड



**संपर्क - अनामप्रेम, गांधी मैदान, अहिल्यानगर 9011918786/7350013805**



मुख्य ऑफिस (गांधी मैदान) : 9011004576, 9422054956
सत्यमेव जयते ग्राम (निंबळक) : 7350517778, 7350013805
यशवंत प्रकल्प (इसळक) : 9011918786, 9422307116

कौशल्य विकास केंद्र, निंबळक : 9011918786, 8788548677
पुणे प्रकल्प : 9011750022, 9372404963
छ.संभाजीनगर प्रकल्प : 9011750035, 9921509199

## देणगी देण्याकरीता बँक तपशिल

| | |
|---|---|
| Bank Name | State Bank Of India |
| Name Of Account | ANAMPREM |
| Branch | Kalyan road ( SME ), Ahilyanagar (Ahmednagar) |
| Account No | 32144934687 |
| Account Type | Current |
| IFSC Code | SBIN0014794 |

आपण देणगी ऑनलाईन जमा केल्यावर पावतीसाठी आपले नाव, पॅन नंबर, पत्ता, मेल आयडी व फोन नंबर ही माहिती संस्थेला anampreminfo@gmail.com या मेल वर अथवा 9011004576 या संपर्क क्रमांकावर कळवावे.